**प्रेसनोट दिनांक ०५/०८/२०१९**

**म्हशीच्या दुधाचा चिक व गावरान तुप विक्री करण्याच्या बहाण्याने जेष्ठ महिलांना भुलथापा मारून फसवणुक करून सोन्याचे दागीने लुबाडणा-या ०४ भामटयांना युनिट १ गुन्हे शाखेकडून अटक**

पुणे शहरामध्ये म्हशीच्या दुधाचा चिक व गावरान तुप विक्री करण्याच्या बहाण्याने जेष्ठ महिलांना भुलथापा मारून फसवणुक करून सोन्याचे दागीने लुबाडणा-या प्रकाराबाबत गुन्हे दाखल झाले होते. सदर गुन्हयांचा समांतर तपास करीत असतांना युनिट १ चे पो.हवा. योगेश जगताप, पो.ना. मल्लीकार्जून स्वामी व सुधाकर माने यांना त्यांचे गुप्त बातमी दारामार्फत माहिती मिळाली की, म्हशीच्या दुधाचा चिक व गावरान तुप विक्री करून फसवणूक करणारे चार इसम त्यांचे तीन मोटार सायकल वरून इंदापुर रोड बांदलवाडी, गुणवडी, मॅकडॉल कंपनीजवळ, बारामती येथे आले आहेत. सदर बाबत वरिष्ठांना कळवून त्यांच्या मार्गदर्शनाखाली कायदेशीर कारवाई करण्याच्या सुचना मिळाल्याने युनिट १ कडील अधिकारी व कर्मचारी यांचेसह बातमीचे ठिकाणी जावून खात्री करून छापा टाकला असता, त्या ठिकाणी बातमी प्रमाणे ०३ इसम मिळून आले.

सदर गुन्हयात खालील नमुद ०३ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांचे नावं पत्ता १) अशोक उर्फ कांटया विश्वनाथ गंगावणे, वय २७ वर्षे, रा. विठ्ठलवाडी, गुणवडी ग्रामपंचायत, बारामती ॲग्रो शेजारी, ता. बारामती, जि. पुणे २) नवनाथ विष्णू वाईकर,, वय २५ वर्षे, रा. इंदापूर रोड, बांदलवाडी, कॅनल जवळ, ता. बारामती, जि. पुणे ३) लंकेश पोपट वाईकर,, वय २२ वर्षे, रा. इंदापूर रोड, बांदलवाडी, कॅनल जवळ, ता. बारामती, जि. पुणे, असे आहे. त्यांना विश्वासात घेवून त्यांचेकडे तपास केला असता, त्यांनी म्हशीच्या दुधाचा चिक व गावरान तुप विक्री करण्याच्या बहाण्याने पुणे शहरातील जेष्ठ महिलांना भुलथापा मारून फसवणुक करून सोन्याचे दागीने लुबाडले बाबत सांगीतले आहे. तसेच जेष्ठ महिलांना ते माझ्या भावाचे लग्न आहे, तुमच्या गळयातील चैन सारखे किंवा मंगळसुत्रा सारखे दागीने माझ्या भावाच्या लग्नात बनवायचे आहेत, माझी आई खाली थांबली आहे तिला दागीने दाखवून आणतो, असे सांगून ते दागीने घेवून मोटार सायकल वरून पळून जात होते, असे सांगीतले आहे. अटक आरोपी क्र. १ ते ३ यांना समर्थ पोलीस ठाणे गु.र.नं. १३४/२०१९ भादविक. ४२०,४५२, ३४ मध्ये अटक करण्यात आली असून मा. न्यायालयाने त्यांना दि. ५/८/२०१९ रोजी पर्यंत पोलीस कस्टडीची रिमांड मंजूर केली आहे. तसेच पाहिजे आरोपी क्र. ४) सुनिल सोमनाथ वाईकर, वय ३० वर्षे, रा. विठ्ठलवाडी, बारामती ॲग्रो कंपनीच्या शेजारी, बारामती, पुणे यास आज रोजी अटक करण्यात आली आहे.

अटक आरोपी यांचेकडून **समर्थ, अलंकार, भारती विद्यापीठ, मार्केटयार्ड, चिंचवड व निगडी** पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल असून त्यांचेकडून **०७ गुन्हे उघडकीस आणले आहेत.** त्यामध्ये अटक आरोपी यांचेकडून **०७ गुन्हयातील २०४ ग्रॅम सोन्याचे दागीने किं. रु. ६,५४,९१२/-**, व गुन्हयात वापरलेली ०४ वाहने त्यामध्ये एक रॉयल इनफिल्ड बुलेट व तीन होंडा मोटार सायकल कि.रु. ३,८३,०००/- व ०३ मोबाईल हॅंडसेट कि.रु. ३३,०००/- **असा एकुण १०,७०,९१२/- रु. चा माल** जप्त केला आहे. आरोपी क्र. १ याचेवर सन २०१६ मध्ये निगडी पोलीस ठाणे येथे सोने चोरीचे ०२ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई ही श्री. अशोक मोराळे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. बच्चन सिंह, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, पो. उप. निरी. दिनेश पाटील, पो.उप.निरी. उत्तम बुदगुडे, पो.उप.निरी. हनुमंत शिंदे, पो.हवा. योगेश जगताप, सुधाकर माने, प्रकाश लोखंडे, अनिल घाडगे, अजय थोरात, मल्लीकार्जून स्वामी, सुभाष पिंगळे, प्रशांत गायकवाड, अमोल पवार, बाबा चव्हाण, तुषार माळवदकर, रिजवान जिनेडी, संजय बरकडे, श्रीकांत वाघवले, उमेश काटे, इरफान मोमीन, इम्रान शेख, तुषार खडके, सचिन जाधव, अशोक माने, विजेसींग वसावे, कैलास गिरी, यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
युनिट १, गुन्हे शाखा, पुणे शहर

